



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०१ ● अंक : २२७ ● शुक्रवार दि. ३१ मे २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये

● Volum : 1 ● Issue : 227 ● Friday, 31 May 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-




दूध उत्पादकांना कोणी वाली आहे का? 3



31 मे जागतिक तंबाखू निषेध दिवस 4

# विशाल अग्रवालने मुलासोबत कारमधील दोन मित्रांच्याही रक्ताचे नमुने बदलले

## मित्रांच्या रक्ताच्या नमुन्यात अल्कोहोल आढळलेच नाही, चौकशी सुरू


**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिट अँड रन प्रकरणातील आपल्या मद्यधुंद मुलाला वाचवण्यासाठी विशाल अग्रवाल याने त्याच्या दोन मित्रांच्या रक्ताचे नमुनेही बदलल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. यासाठी अग्रवालने ससूनचे डॉ. अजय तावरे आणि डॉ.श्रीहरी हळनोर यांना रग्गड पैसा दिल्याचे समोर आले आहे. पबमधील पार्टीत यथेच्छ दारू ढोसल्यानंतर मुलाने 160 किमीच्या सुसाट वेगाने पोर्शे कार चालवून दोन तरूण आयटी प्रोफेशनल्सना चिरडले होते. त्या वेळी त्या कारमध्ये त्याचे दोन अल्पवयीन मित्रही बसलेले होते. त्यांनीही मद्यप्राशन केले होते. परंतु फॉरन्सिक चाचणीत त्यांच्या रक्ताच्या नमुन्यात अल्कोहोलचा अंश आढळून आला नाही त्यामुळे पोलिसांनी आश्चर्य व्यक्त केले असून आता याबाबतही चौकशी सुरू झाली आहे. 18 मे रोजी अल्पवयीन आरोपीने बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्याने दहा ते बारा मित्रांसमवेत मुंढवा येथील कोझी हॉटेलमध्ये रात्री



साडेनऊ ते बारा वाजण्याच्या दरम्यान टेबल क्रमांक 15 वर पार्टी केली. त्यावेळी त्यांनी कोझी चिकन ,स्पाइस चिकन हे खाद्यपदार्थ जेवण्यासाठी ऑर्डर केले. मात्र त्यासोबत जे.डब्ल्यू ,ब्लॅक लेबल अशी मद्य देखील ऑर्डर केली. तसेच नंतर मुलांनी 19 मे रोजी रात्री बारा ते एक वाजण्याच्या दरम्यान मित्रांसोबत मेरियट संलग्न हॉटेल ब्लॅक मुंढवा येथे पुन्हा मद्य घेतल्यानंतर पोर्श कार ताशी 160 किमी भरधाव चालवून दोन जणांचा चिरडले. अपघातानंतर येरवडा पोलिसांनी गाडीमधील अल्पवयीन आरोपी त्याचे दोन साथीदार आणि कारचालक यांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. त्यांची चौकशी केल्यावर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आणि ससून रुग्णालयात त्यांची वैद्यकीय चाचणी होऊन रक्ताचे नमुने घेण्यात आले.मात्र ,बिल्डर विशाल अग्रवाल याने पैशांच्या जोरावर मित्रांच्या रक्ताच्या नमुन्यांचे अहवाल डॉक्टरांसोबत मॅनेज केल्याने गाडीतील तिन्ही मुलांच्या रक्तात अल्कोहोल आढळले नाही. त्यामुळे केस कमकुवत झाली आहे. मद्यधुंद दिवट्या चिरंजीवाला वाचवण्यासाठी ससूनच्या डॉक्टरांनी एका महिलेचे रक्त नमुने घेतल्याचे फॉरेन्सिक अहवालात स्पष्ट झाले असून ही महिला म्हणजे दिवट्या चिरंजीवाची आईच असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे डॉक्टरांनी अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने कचऱ्यातही फेकले नव्हते तर एका भलत्याच व्यक्तीला सोपवल्याचे पोलिस चौकशीत समोर आले आहे. आता या अज्ञात व्यक्तीचा पोलिस शोध घेत आहेत. अल्पवयीन दिवट्या चिरंजीवाला वाचवण्यासाठी ससूनचे दोन डॉक्टर,एक शिपाई, त्याशिवाय तीन नर्स अशा एकूण पाच जणांनी मदत केल्याचे तपासात समोर आले आहे. त्यामुळे पोलिसांनी आता ससूनच्या शिपायापासून ते वरिष्ठांपर्यंत सर्वांचीच चौकशी सुरु केली आहे. दरम्यान, रक्ताचे नमुने बदलणारे ससूनच्या फॉरेन्सिक विभागाचा निलंबित डॉ.अजय तावरे, डॉ.श्रीहरी हळनोर या दोघांसह शिपाई अतुल घाटकांबळे यांना 5 जूनपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

> **बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवालने मध्यस्थामार्फत ससून रुग्णालयाचा फॉरेन्सिक विभागाचा प्रमुख डॉ. अजय तावरे याच्याशी व्हॉट्सअॅप आणि कॉलद्वारे घटनेच्या दिवशी वारंवार संपर्क साधला. त्यानुसार त्यांच्या रक्ताचे नमुने बदलण्यासाठी मोठी आर्थिक तडजोड झाली. अग्रवालच्या सांगण्यानुसार एका कारमधून दोन जण ससून रुग्णालयात आले. त्यांनी डेड हाऊस शिपाई अतुल घाटकांबळेजवळ तीन लाखांची रोकड डॉ. अजय तावरेच्या सांगण्यानुसार दिली. त्यापैकी ५० हजार रुपये घाटकांबळेकडून तर अडीच लाख रुपये डॉ. श्रीहरी हळनोरकडून जप्त केले गेले.**




## ठळक बातम्या

### आधारकार्ड मागताच तारांबळ

**पुणे : (आरंभ पर्व)** : पोर्शे कार अपघातानंतर अल्पवयीन मुलं व्यसनाच्या आहारी जातायेत का? हा प्रश्न ऐरणीवर आल्यानंतर पिंपरी चिंचवड पोलिसांनी ॲक्टिव्ह मोड मध्ये आली आहे. शहरातील रस्ते अन् गल्ली-बोळातून ते दुचाकीवर रात्र गस्त घालतायेत. या दरम्यान येणारे पब, हुक्का पार्लर आणि बारमध्ये अल्पवयीन मुलांना प्रवेश दिला जातोय का? अल्पवयीन मुलं कुठं गैरकृत्य करतायेत का? यावर आता पोलीस करडी नजर ठेवत आहेत . पोर्शे कार अपघातानंतर पिंपरी चिंचवड पोलीस खडबडून जागी झालीये, ती ॲक्टिव्ह मोड मध्ये आलीये. त्यांच्याकडून रात्री कारवाई सुरु आहे.

# मोदी-राहुल यांच्या सभांचा धडाका शांत

## ‘तोंड उघडले तर हिशेब निघेल’

**होशियारपूर (पंजाब) (दै. आरंभ पर्व)**

“सध्या मी गप्प बसलो आहे, ज्या दिवशी तोंड उघडेन, तेव्हा तुमच्या सात पिढ्यांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडेन,” असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज होशियारपूर येथील सभेतून दिला. ‘इंडिया’ आघाडीचे लोक मला नवनवीन दूषणे देतात. पण काँग्रेसने भ्रष्टाचारात दुहेरी पीएचडी मिळवली आहे. आता तर आम आदमी पक्षही त्यात सामील झाला आहे, अशीही टीका त्यांनी केली.

पंजाबमध्ये प्रचाराच्या शेवटच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी होशियारपूरच्या रामलीला मैदानात सभा घेतली. होशियारपूरच्या भाजपच्या उमेदवार अनिता सोमप्रकाश आणि आनंदपूर साहिबचे उमेदवार सुभाष शर्मा यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत मोदी बोलत होते.

ते म्हणाले, “माझ्या गप्प बसण्यामागे कमकुवतपणा समजू नका. ज्यादिवशी तोंड उघडेन, त्यादिवशी तुमच्या सात पिढ्यांचा हिशोब बाहेर काढला जाईल. ‘इंडिया’ आघाडीचे लोक जवानांचा सतत अपमान करतात. त्यांनी दिवंगत जनरल बिपिन रावत यांना गल्लीतला गुंड म्हणून म्हटले होते. हा लष्कराचा अवमान होता. काँग्रेसच्या राजवटीत लष्कराला कमकुवत करण्यात कोणतीही कसर ठेवली नव्हती. मला काहीही बोला, परंतु देशाच्या लष्कराचा अपमान सहन करणार नाही.” आदमपूर विमानतळाला गुरु रविदास यांचे नाव दिले जाईल, अशी घोषणाही पंतप्रधानांनी यावेळी केली.



गरिबांचे कल्याण करणे मोदी सरकारचे प्राधान्य राहिले आहे आणि यात गुरु रविदास यांची प्रेरणा आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत आमच्या सरकारने एक क्षणही वाया घालवला नाही. सरकार स्थापन होताच पुढील 125 दिवसांत काय करणार, याचा आराखडा तयार केला आहे. यातही 25 दिवस तरुणांवर भर दिला जाणार आहे. पुढील पाच वर्षांत कोणते मोठे निर्णय घ्यायचे आहेत, याचीही तयारी केली आहे, असे मोदी म्हणाले.

काँग्रेस आणि ‘इंडिया’ आघाडीच्या स्वार्थी आणि मतांच्या राजकारणाने देशाचे खूप नुकसान झाले आहे. मतपेढीवर असणाऱ्या प्रेमामुळे देशाच्या फाळणीच्या वेळी कर्तारपूर साहिबवर आपला हक्क दाखवता आला नाही, असा दावाही पंतप्रधान मोदी यांनी केला.









# मोदी चालवतायत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचा वारसा





आपल्याला लहानपणापासूनच शिकवले गेले आहे कि पाश्चात्य संस्कृती आपल्या पेक्षा श्रेष्ठ आहे त्यामुळे भारताने डोळे झाकून त्यांना व त्यांच्या नेत्यांना अनुसरले पाहिजे. परंतु नरेंद्र मोदी यांनी आपल्याच मातीतील युगपुरुषांना आपले प्रेरणास्थान मानून, अहिल्यादेवी होळकर यांसारख्या दिग्गज राज्यकर्त्यांचा वारसा पुढे नेऊन, एकप्रकारे 'Narrative' च बदलून टाकला आहे."

31 मे 1725, आजच्याच दिवशी, महाराष्ट्रामधील अहिल्यानगर येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा जन्म झाला होता. होय, त्याच अहिल्याबाई होळकर ज्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आज भारत देशामध्ये, हिंदू धर्म आणि मंदिर अजूनही अस्तित्वात आहेत, आज अजूनही भारतीय जनतेची नाळ हिंदू धर्माशी जोडली आहे. त्यांनी आपल्या पराक्रमाने मैदान गाजवलेच पण त्या देशभरातील हिंदू मंदिरांच्या आद्य, निर्मात्या आणि संरक्षक म्हणून प्रसिद्ध होत्या. अहिल्याबाई होळकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या लोककल्याणकारी राज्याची परंपरा पुढे चालवत देशाची राष्ट्रीय एकात्मता साध्य केली. आणि अशाच दिग्गज राजकर्त्यांच्या कामाची, प्रेरणा कुठे तरी पंतप्रधान मोदी यांनी घेतली आहे. परोपकार आणि धर्म भक्तीसाठी ओळखल्या जाणाऱ्या अहिल्याबाईंनी आपल्या कर्तबगारीने मालवा प्रांतावर आपली छाप सोडली. त्यांनी आपल्या लोकांच्या कल्याणासाठी किल्ले, रस्ते, मंदिरे आणि धर्मशाळांच्या बांधकामासह अनेक प्रकल्प हाती घेतले. त्यांनी आपल्या लोकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी दररोज सार्वजनिक श्रोते आयोजित केले आणि गरजूंना मार्गदर्शन आणि समर्थन प्रदान केले.

अहिल्याबाई होळकर यांच्यामुळेच सध्याचे काशी विश्वनाथ संकुल, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संपूर्ण भव्यतेने जीर्णोद्धार करण्यात आले. अहिल्याबाई होळकर यांच्यामुळेच की, इस्लामिक आणि युरोपीय आक्रमणांमुळे सांस्कृतिक आघात सोसलेल्या भारताला पुरातन काळातील वैभव काही प्रमाणात, पूर्णपणे नाही तर परत मिळाले अनेक आव्हानांचा सामना करूनही, अहिल्याबाई होळकर यांनी भारतीय संस्कृती, अध्यात्मवाद आणि हिंदू धर्माचे रक्षण, पुनर्बांधणी आणि मजबूत पाया घालण्यात कोणतीही कसर सोडली नाही.

या संदर्भात होळकरांनी काय साधले याची कोणीही बरोबरी करू शकत नसले तरी, हिंदू पवित्र स्थळांचे इतक्या मोठ्या प्रमाणावर पुनर्बांधणी आणि नूतनीकरण करणारे मोदी हे त्यांच्यानंतरचे पहिले हिंदू नेते आहेत असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. त्याच प्रमाणे 240 वर्षानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी माळव्यातील 18व्या शतकातील प्रसिद्ध हिंदू राणी अहिल्याबाई होळकर यांचा आदर्श घेऊन त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत, अध्यात्मवाद आणि धर्माच्या महान केंद्रांचे परिवर्तन आणि पुनरुज्जीवन करताना दिसून येत आहेत. दोघेही गरीब आणि नम्र पार्श्वभूमीतून उच्च पदांवर पोहोचले आहेत. होळकरांचा जन्म धनगर समाजातील एका मेंढपाळ कुटुंबात झाला जो सध्या महाराष्ट्राच्या विमुक्त जाती आणि भटक्या जमातींच्या यादीत मोडतो. त्याचप्रमाणे, मोदी हे तेली जातीचे आहेत जी सुद्धा इतर मागासवर्गीय मध्ये मोडते.

जर बारकाईने बघितले तर, दोन्ही नेत्यांच्या प्रशासकीय गुणांमध्ये आणि फोकसमध्ये साम्य देखील आढळू शकते. नरेंद्र मोदी हे अहिल्याबाई होळकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय स्तरावर हिंदू पवित्र स्थळांचे नूतनीकरण आणि पुनर्बांधणी करताना दिसून येत आहेत. अयोध्येतील राम मंदिराचा गुंतागुंतीचा प्रश्न इतक्या सौहार्दपूर्ण आणि सुरळीतपणे सोडवला जाईल, असे कधीच कोणी वाटले नव्हते. आज भव्य मंदिर उभारणी केली आहे. हे श्रेय कोणाला जाते? परदेशात अध्यात्मवाद आणि धर्मांची अनेक केंद्रे उभारण्यात नरेंद्र मोदी यांचा मोठा हात आहे. काही विरोधक अजूनही सर्वोच्च न्यायालयाने राम मंदिरा बाबत दिलेल्या निकालाचे श्रेय मोदींना देत नाहीत, परंतु हे लक्षांत घेणे अत्यंत महत्व पूर्वक आहे कि जर सरकार मोदीयांचे नसते आणि दुसरे कोणाचे असते, तर हा निकाल राम मंदिराच्या बाजूने लागला असता का? लोकसभा निवडणुकी दरम्यान तर काही माजी काँग्रेस सदस्यांनी कबुली पण दिली आहे कि, जर राहुल गांधी सतीत आले, तर ते राम मंदिर बंद करून टाकतील. अहिल्याबाई होळकर, यांच्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच सर्वात मोठी प्राण प्रतिष्ठा केली आहे. BHU च्या पुरातत्व विभागाचे प्राध्यापक अशोक सिंह म्हणाले की, चारशे वर्षांपूर्वी, 17 व्या शतकात, काशीचे बाबा विश्वनाथ आणि गया येथील विष्णू मंदिरातील प्राणप्रतिष्ठा यांची पूजा खूप भव्य होती. त्याची तयारी अनेक महिने सुरू होती. ही प्राणप्रतिष्ठा पूजा राणी अहिल्याबाई यांनी केली होती. त्या वेळी, सर्व राजांना कार्यक्रमासाठी आमंत्रित केले गेले आणि अनेक दिवस मंदिराची अभिषेक पूजा पूर्ण विधीपूर्वक केली गेली. मंदिरे आणि तीर्थक्षेत्रांच्या पुनर्बांधणीच्या कामात नरेंद्र मोदी कदाचित देवी अहिल्याबाई होळकरांना बरोबरी करता येणार नाही, पणअहिल्याबाई होळकर नंतर हिंदू पवित्र स्थळांसाठी सर्वात जास्त काम करणाऱ्या व्यक्ती म्हणून त्यांची गणना नक्कीच होईल. ज्या वेळी परदेशी आक्रमणांमुळे आणि मुघलांमुळे, सामान्य जनतेची त्यांच्या धर्माशी जोडलेली नाळ नाजूक झाली होती, त्यावेळी पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी त्यांना त्यांच्या कामा मार्फत हिंदुधर्म त्याला पुनरुजीवित केले. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील एक प्रकारे जागतिक पातळीवर हिंदू चेतना जागृत केली, जेव्हा हिंदूंना स्वतःच्या धर्माबद्दल फारशी आस्था उरली नव्हती. हा तोच काळ आहे, जेव्हा भारतातील हिंदूंची संख्या 7. 82% ने कमी झाली आहे. अशा काळात एका राष्ट्रीय नेत्याने लोकांमध्ये हि जागरुकता निर्माण करणे, हिंदु धर्माच्या दृष्टीने खूप महत्वाचे योगदान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आणखी एका महत्त्वाच्या उपक्रमचा इथे उल्लेख करण्याजोगा आहे, जो आपल्या प्राचीन योगशास्त्राच्या जागतिक मान्यताशी संबंधित आहे. योग, जो आपल्या संस्कृतीचा आणि आपल्या आध्यात्मिक जीवनशैलीचा अविभाज्य भाग आहे, आज केवळ भारतातच नाही तर परदेशातही कोट्यवधी लोकांना उपचार आणि मदत करत आहे. तो जगभरातील लोकांसाठी जीवनाचा एक मार्ग बनला आहे. जे अध्यात्माचा मार्ग अवलंबत नाहीत त्यांच्यासाठी ते शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारण्याचे साधन बनले आहे. गंभीर आव्हाने आणि संकटांचा सामना करूनही पंतप्रधान मोदींनी कोट्यवधी भारतीयांच्या जीवनावर आपल्या विविध उपक्रमांद्वारे केलेले सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव आपल्या इतिहासात कायमचे कोरले जाईल. अहिल्याबाई होळकर या स्वतः माळवा राज्यात सती प्रथेच्या विरोधात उभ्या होत्या. वाईट प्रथा मोडीत काढत त्यांनी मुलींचे लग्नाचे वय वाढविण्याचे धाडसी पाऊल उचलले. विधवांना मालमत्तेत हक्क दिला. त्यांनीच माळवा सैन्यात स्वतंत्र महिला तुकडी स्थापन केली. त्याप्रमाणेच, मोदींनीही तिहेरी तलाकची ह्या कुप्रथेवर बंधन लावून लाखो मुस्लिम बहिणींना न्याय मिळवून दिला आहे. यापलीकडे महिलांना वडिलोपार्जित संपत्ती मध्ये त्यांचा वाट मिळावा म्हणून समान नागरिक कायदा आणण्याचा प्रयत्न त्याची सरकार करत आहेत. मोदींमुळेच सशस्त्र दलात महिलांसाठी कायमस्वरूपी कमिशन आता प्रत्यक्षात आले आहे. अहिल्याबाईंनी जमीन महसूल व्यवस्थापनाची प्रक्रिया सोपी केली होती, मोदी सरकारही जमीन व्यवस्थापनाचे सुलभीकरण करण्यात गुंतले आहे. भूमी अभिलेखांचे डिजिटायझेशन यांसारखी इतर अनेक महत्त्वाची कामे स्वामीत्व योजनेतून केली जात आहेत. अहिल्याबाईंनी महेश्वरमध्ये स्थानिक हातमाग उद्योग विकसित केला आणि जगाला महेश्वरची साडी भेट दिली. मोदी 'वोकल फॉर लोकल'लाही प्रोत्साहन देत आहेत. लोकमतच्या राजवटीत रस्तेबांधणी आणि जलसंधारणाच्या पायाभूत सुविधांवर भर देण्यात आला. आज मोदी सरकार विक्रमी वेगाने महामार्ग बांधत आहेत आणि जलसंधारणाला चालना देत आहेत.

# राजगुरुनगरमधील कॅफे व लॉजवर धडक कारवाई

## कारणे दाखवा नोटीस आणि दंडात्मक कारवाई

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड पोलीस ठाणे व राजगुरुनगर नगरपरिषद यांनी शहरातील तेरा कॅफे आणि चार लॉजवर संयुक्त धडक कारवाई केली.

महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनी मैत्रीच्या नावाखाली कॅफेच्या आडोशाला जाऊन अश्लील चाळे करत असल्याने ही कारवाई केली. पोलिसांच्या उपस्थितीत झालेल्या या कारवाईदरम्यान या कॅफेंमध्ये अनेक आक्षेपार्ह प्रकार व साहित्य आढळून आले.

मागील महिन्यात शहरातील दोन अल्पवयीन मुलींना मद्य पाजून तसेच अंमली पदार्थांचे इंजेक्शन देऊन बलात्काराची घटना घडली होती. अल्पवयीन मुली आणि आरोपी यांच्यात असलेल्या मैत्री आणि त्यापुढील घृणास्पद प्रकार घडण्याला कॅफे व अनधिकृत लॉज कारणीभूत असल्याचे या कारवाई दरम्यान समोर आले आहे.

या कारवाईत नगरपरिषदेचे 60 अधिकारी, कर्मचारी तसेच दोन अधिकाऱ्यांसह 17 पोलिस आणि होमगार्ड कर्मचारी यांचे पथक सहभागी झाले होते. पाबळ रोड, पुणे-नाशिक जुना महामार्ग परिसरात ही कारवाई करण्यात आली. कारवाईची माहिती मिळताच अनेक कॅफेचालकांनी कॅफेला कुलूप लावून पोबारा केला. मात्र, तरीही कुलुपे तोडून बंद कॅफे उघडण्यात आले.अनेक कॅफेमध्ये डान्स बारप्रमाणे मंद आकर्षक लाईट, म्युझिक सिस्टिम पाहायला मिळाल्या. दोघांना बसता येईल अशी बैठक व्यवस्था व आडोसा अशी रचना पाहायला मिळाली. अनेक ठिकाणी आजूबाजूला बिअर, दारूच्या बाटल्या आणि आक्षेपार्ह साहीत्य मिळून आले.

बहुतांशी कॅफमध्ये लाकडी, प्लायवूडने तयार करण्यात आलेल्या आक्षेपार्ह बैठक व्यवस्था नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी तोडून काढल्या. मोडतोड केलेले साहित्य वाहनांमध्ये भरुन पोलिस ठाण्यात जमा करण्यात आले. या कारवाईचे शहर परिसरातील नागरिकांनी स्वागत केले आहे. कॅफेचालकांबरोबर जागामालकांवर देखील कडक कारवाई करावी, अशी मागणी शहरातून होत आहे.

शहरातील १३ कॅफेंवर आणि ४ लॉजवर कारवाई करण्यात आल्याची माहिती खेड पोलिस ठाण्याचे निरीक्षक राजकुमार केंद्रे यांनी दिली. राजगुरुनगर नगरपरिषद व खेड पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.२९) छापे टाकण्यात आले. कॅफेची तपासणी करून जे कॅफे विनापरवाना आहेत, अशा कॅफेमालकांवर ५ हजार रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली. इतर कॅफेमालकांना इमारतीचा आराखडा बदली करून त्यामध्ये बदल करून लहान खोल्या तयार केल्याने कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. शहरातील एकूण १३ कॅफेचे ठिकाणी तपासणी करण्यात आली, तसेच पोलिस ठाणे हद्दीमधील एकूण ४ लॉजिंग बोर्डिंगवर छापे टाकण्यात आले. तेथील रजिस्टर व ग्राहक यांचे ओळखपत्र घेतले अगर कसे? याबाबत तपासणी केली, तेव्हा रजिस्टर अपूर्ण असल्याचे व अनेक ग्राहकांकडून ओळखपत्र घेतले नसल्याचे आढळून आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यावर जिल्हाधिकारी यांनी लॉजिंग बोर्डिंग अस्थापनेबाबत घालून दिलेल्या नियम, अटी व शर्थींचे उल्लंघन केले असल्याचे आढळून आल्याचे व त्यामुळे त्यांच्यावर भा.दं.वि कलम १८८ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. लॉजिंगमध्ये मिळून आलेल्या ग्राहकांकडे विचारपूस केली असता ते एकमेकांच्या संमतीने आले असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सोडून देण्यात आल्याचे पोलीसांनी सांगितले.

# सायबर सिक्युरिटिजवर अभ्यासक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि ट्रान्सेंडेंटल टेक्नॉलॉजीज यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात सायबर सिक्युरिटी, सायबर फॉरेन्सिक्स आणि सायबर क्राइम इन्व्हेस्टिगेशन या विषयातील सर्वसमावेशक व्यावसायिक प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

13 जून 2024 पासून सुरू होणारा हा अभ्यासक्रम ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने घेण्यात येणार आहे.

विद्यार्थी, व्यावसायिक आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यामध्ये माहिती प्रणालीचे रक्षण करण्याची आणि सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी आवश्यक कौशल्ये असावी, या उद्देशाने हा अभ्यासक्रम बनविण्यात आला आहे. यात 2 महिन्यांचा कालावधी असलेला 18 क्रेडिटचा सायबर सिक्युरिटी स्पेशलिस्ट (सीएसएस), 6 महिन्यांचा कालावधी असलेला 20 क्रेडिटचा मास्टरींग इन्फॉर्मेशन सिक्युरिटी (एमआयएस) आणि 6 महिन्यांचा कालावधी असलेला 28 क्रेडिटचा सायबर क्राइम इन्वेस्टिगेटर (सीसीआय) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

हे अभ्यासक्रम डायरेक्ट ॲक्शन इंटरनॅशनल यूके आणि कॅनेडियन असोसिएशन फॉर सिक्युरिटी अँड इंटेलिजेंस स्टडीज, व्हॅन्कुव्हर कॅनडाद्वारे मान्यताप्राप्त आहेत.

या अभ्यासक्रमात आक्षेपार्ह आणि बचावात्मक सुरक्षा, एसओसी आणि एसआयईएम, सायबर इंटेलिजन्स आणि इन्व्हेस्टिगेशन, डार्क वेब, सायबर फॉरेन्सिक्स आणि क्लाउड सुरक्षा, नेटवर्क सुरक्षा आणि क्रिप्टोग्राफी यासारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे.

# फोनपेतर्फे विविध श्रेणींमध्ये लोन ऑफरची घोषणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील अग्रणीय फिनटेक कंपनी असलेल्या फोनपे ने आज आपल्या प्लॅटफॉर्मवरून दिल्या जाणाऱ्या लोनमध्ये सहा प्रमुख श्रेणींमध्ये विस्तार केल्याची घोषणा केली आहे - यामध्ये बाईक लोन, कार लोन, होम लोन, गोल्ड लोन, एज्युकेशन लोन आणि म्युच्युअल फंड लोनचा समावेश आहे. यासाठी विश्वासार्ह बँकांच्या नेटवर्कसह भागीदारीत, नॉन बँकिंग वित्तीय कंपन्या आणि फिनटेक्स यांचा समावेश आहे. फोनपे आपल्या535 हून अधिक दशलक्ष नोंदणीकृत युजरच्या अतुलनीय वितरणासह, युजर्सना सुरक्षित लोन श्रेणीमध्ये एक भक्कम आणि नियमित अनुभव देण्याचे उद्दिष्ट्य ठेवते. फोनपे ने टाटा कॅपिटल, एल अँड टी फायनान्स, हिरो फिनकॉर्प, मुथ्थूट फिनकॉर्प, डीएमआय हाऊसिंग फायनान्स, होम फर्स्ट फायनान्स, रुपे, व्हॉल्ट मनी, ग्रॅडराइट सारख्या काळजीपूर्वक निवडलेल्या कर्जदात्यांशी भागीदारी केली आहे आणि येत्या आठवड्यात यात आणखी काही कर्जदाते जोडले जाणार आहेत. प्लॅटफॉर्मवर सध्या 15 सक्रिय भागीदार आहेत आणि पुढील तिमाहीत 25पर्यंत वाढवण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. युजर त्यांच्या फोनपे ॲपवरील सध्याच्या 'लोन' विभागांतर्गत कर्ज सुविधेचा लाभ घेऊ शकतात, त्यांना हवी ती लोन श्रेणी निवडू शकतात आणि कर्जदात्यांच्या सूचीमधून ती निवडू शकतात. लोन अर्जाचा प्रवास फोनपे च्या परिचित असलेल्या ॲपद्वारे सुरू केला जातो, एकाधिक ॲप्लिकेशन्स नेव्हिगेट करण्याची गरज दूर करून आणि युजरसाठी ही प्रक्रिया सुलभ केली जाते.

# आईलाही चौकशीसाठी पोलिस बोलावणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अल्पवयीन आरोपीच्या घेतलेल्या रक्ताच्या नमुन्यांऐवजी ते एका महिलेचे असल्याचे उघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर आता पोलिसांकडून अल्पवयीन आरोपीच्या आईला चौकशीसाठी बोलावण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. वैद्यकीय तपासणीवेळी घेतलेले रक्ताचे नमुने अल्पवयीन आरोपीचे नसल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी गुन्हे शाखेने ससून रुग्णालयातील न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख डॉ. अजय तावरे, आपत्कालीन विभागाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर याच्यासह शिपाई अतुल घटकांबळे याला अटक केली होती. या प्रकरणात नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल अद्याप जाहीर झालेला नाही. हा अहवाल समोर आल्यानंतर आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता आहे. दरम्यान, या सर्व घडामोडींनंतर अल्पवयीन आरोपीची आई बाहेरगावी असल्याचे समजते.

# सरपंचपदी मोनिका श्रीकांत कंद

## जिल्ह्याचे भाजपचे नेते प्रदिप कंद यांच्या कुटुंबात पाचव्यांदा सरपंच पद

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

पूर्व हवेलीतील तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या लोणीकंद गावच्या सरपंच पदी मोनिका श्रीकांत कंद यांची बिनविरोध निवड झाली. त्यामुळे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा पिडीसीसी बँकेचे संचालक जिल्ह्याचे नेते प्रदीप कंद यांच्या कुटुंबात पाचव्यांदा सरपंचपद आले आहे. लोणीकंदच्या सरपंच प्रियांका योगेश झुरुंगे यांनी सरपंच पदाचा



राजीनामा दिल्याने दरम्यानच्या कालावधीत उपसरपंच राहुल शिंदे यांनी प्रभारी सरपंचपदाचा कार्यभार सांभाळला. त्यानंतर अतिरिक्त तहसीलदारांच्या आदेशानुसार लोणीकंद ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची निवडणूक मंडलधिकारी संदीप झिंगाटे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

यामध्ये मोनिका श्रीकांत कंद यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी झिंगाटे यांनी त्यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केलयावेळी पदाधिकारी व ग्रामस्थांच्या वतीने नवनिर्वाचित सरपंच मोनिका श्रीकांत कंद यांचा सन्मान पार पडला. यावेळी बाजार समितीचे माजी सभापती नारायणराव कंद, माजी उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती रवींद्र कंद, माजी सरपंच श्रीकांत कंद, माजी सरपंच अनिल होले, माजी उपसरपंच गजानन कंद, संतोष झुरुंगे, माजी सरपंच लक्ष्मीताई कंद, लीना कंद, सुलोचना झुरुंगे, प्रियांका झुरुंगे, माजी उपसरपंच राहुल शिंदे, ग्रामपंचायत सदस्य सुधीर कंद, गौरव झुरंगे, सागर कंद, आशिष गायकवाड, नंदकुमार कंद, ओंकार कंद, अतुल मगर,सरस्वती दळवी, डॉ.सोनाली जगताप, दीपाली राऊत, सुप्रिया कंद, कावेरी कंद, सुजाता कंद, सोमेश्वर महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा पूजा कंद आदी उपस्थित होते.

समाजकारणाला प्राधान्य देत लोणीकंद गावच्या विकासावर लक्ष केंद्रित करणार असून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली, ग्रामपंचायत कार्यकारिणी व सर्व संबंधित घटकांच्या सहयोगातून नागरी हितासाठी पिण्याचे शुद्ध पाणी,कचरा व्यवस्थापन,तसेच दर्जेदार रस्ते आदींसह विविध विकासकामे करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे नवनिर्वाचित सरपंच-ग्रामपंचायत लोणीकंद मोनिका श्रीकांत कंद यांनी सांगितले.

# थोडक्यात



## राज्याबाहेर जाणाऱ्या उद्योगांबाबत उपाय शोधण्यासाठी समिती

**पुणे (आरंभ पर्व) :** राज्यातील उद्योग व्यवसायांपुढील समस्या तसेच राज्यातील उद्योग-धंदे बाहेरच्या राज्यात जाण्याबाबत विरोधकांनी केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी उद्योग संचालनालयाचे आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासनाने अभ्यास समितीची स्थापन केली आहे. याबाबतचा आदेश उद्योग विभागाचे सह सचिव संजय देगांवकर यांनी काढले आहेत. ही समिती उपलब्ध औद्योगिक भूखंडाची माहिती ऑनलाइन रिअल टाइम स्वरूपात पोर्टलवर उपलब्ध करून देणे, वापरात नसलेल्या औद्योगिक भूखंडाचा वापर करणे अथवा ते भूखंड पुन्हा ताब्यात घेऊन त्याचे पुर्नवाटप करणे, याबाबत शासनाला शिफारस करणार आहे. तसेच एमआयडीसी बाहेरील औद्योगिक समूहांना पायाभूत सुविधा पुरविणे, राज्यातील उद्योगांना भेडसावणाऱ्या विविध उपद्रवी घटकांचा बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना सुचविणे, औद्योगिक क्षेत्रालगतच्या जागेवर रहिवासी वापरास परवानगी देणे आदी विषयांवर ही समिती राज्य शासनाला मार्गदर्शन करणार आहे. राज्यातील उद्योगांना चालना देण्याकरिता तसेच सुरु असलेल्या उद्योगांच्या समस्यांचे निराकरण करण्यासंदर्भात राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली मागील महिन्यात उद्योग विभागाच्या शक्ती प्रदान समितीची बैठक झाली. त्यामध्ये ही समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समितीमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभागाचे सचिव, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्याचे जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव आणि नगर रचना विभागाचे संचालक यांचा समावेश करण्यात आला आहे.

## गणेशखिंड रस्त्यावर वाहतुकीत बदल



**पुणे (आरंभ पर्व)** : गणेशखिंड रस्त्यावरील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील आचार्य आनंद ऋषिजी चौक ते शिवाजीनगर न्यायालयादरम्यान टाटा मेट्रोचे काम सुरु आहे. या भागात वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी येत्या शनिवार (ता. 1) पासून वाहतुकीत तात्पुरत्या स्वरूपात बदल करण्यात येणार आहेत. टाटा मेट्रोकडून पुणे विद्यापीठासमोरील चौकात बीमचे बांधकाम, आरबीआयसमोर मेट्रो स्टेशनचे गर्डर लाँचिंग, सिमला ऑफिस चौकाजवळ सीओईपी वसतिगृहाच्या पाणीपुरवठा वाहिनीचे स्थलांतरण यासह पाच नवीन पिलर्सची उभारणी करण्यात येणार आहे. या कालावधीत गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी वाहतुकीत बदल करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील आणि वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त रोहिदास पवार यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

# मलाबार समूहाकडून 'भूकमुक्त जग' उपक्रमाच्या व्याप्तीत वाढ

## दररोज ५१,००० पौष्टिक अन्न पाकिटांचे वाटप : मलाबारकडून पुण्यात दररोज १,००० अन्न पाकिटांचे वितरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गरजूंना पौष्टिक जेवण दैनंदिनरित्या पुरवण्यासाठी मलाबार समूहाद्वारे सुरू असलेला 'भूकमुक्त जग' (हंगर-फ्री वर्ल्ड) हा सीएसआर कार्यक्रम अधिकाधिक लोकांना आणि शहरांचा समावेश करत विस्तारण्यात येणार आहे. संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास लक्ष्य 2 - शून्य भूक यानुसार योजित या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाअंतर्गत सध्या 31,000 अन्न पाकिटांचे वितरण करण्यात येत आहे. विस्तारीत कार्यक्रमाच भाग म्हणून आता दररोज 51,000 पौष्टिक अन्न पाकिटांचे वाटप केले जाईल.




पुण्यात आयोजित कार्यक्रमात जागतिक भूक दिन पाळण्यात आला. त्याप्रसंगी, प्रमुख पाहुणे हडपसरचे विधानसभा सदस्य चेतन विठ्ठल तुपे (पाटील) आणि साधना सहकारी बँकेचे अध्यक्ष शुभाष नरसिंग काळभोर, मगरपट्टाचे संचालक आबासाहेब मगर यांच्यासह यांनी या उपक्रमाला हिरवा झेंडा दाखवून कार्यक्रमाची सुरुवात केली. या कार्यक्रमादरम्यान संपूर्ण मलाबार व्यवस्थापन संघाने या महत्त्वपूर्ण उपक्रमाशी बांधिलकीची शपथ घेतली. 'भूकमुक्त जग' कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, मलाबार दररोज 1,000 अन्न पाकिटांचे पुण्यात गरजूंना वितरण करत आहे. या उपक्रमाला पाठिंबा देण्यासाठी मलाबार समूहाने अमरावती आणि नागपूर येथे नवीन स्वयंपाकघर सुरू केले आहेत. याव्यतिरिक्त, जागतिक भूकमुक्त दिनाचा भाग म्हणून पश्चिम विभागातून 8,000 अन्न पाकिटांची नव्याने भर घालण्यात आली आहे.

सध्या हा कार्यक्रम आखाती देशांमधील काही केंद्रांव्यतिरिक्त भारतातील केंद्रशासित प्रदेशांसह 16 राज्यांमधील 37 शहरांमध्ये राबविण्यात येत आहे. विस्ताराचा एक भाग म्हणून, या कार्यक्रमात आता 16 राज्यांमधील 70 शहरांचा समावेश केला जाईल. याशिवाय, जगातील सर्वात मोठ्या सोन्याच्या खाणकामासाठी ओळखल्या जाणाऱ्या झांबिया या आफ्रिकन देशातील शाळकरी मुलांसाठी देखील हाच कार्यक्रम सुरू करण्याची समूहाची योजना आहे.

"आमच्या आजूबाजूला असे बरेच लोक आहेत जे दिवसातून किमान एक चौरस जेवण मिळविण्यासाठी धडपडत आहेत. आपल्या जगातून भूकेला दूर करण्यासाठी कठोर परिश्रम करणाऱ्या सरकार, यंत्रणा आणि स्वयंसेवा संस्थांना मदतीचा एक छोटासा हात म्हणून आम्ही हा कार्यक्रम सुरू केला आहे," असे याप्रसंगी एम. पी. अहमद म्हणाले.

'थानल - दया रिहॅबिलिटेशन ट्रस्ट' या सामाजिक कल्याणकारी उपक्रमातील प्रतिष्ठित स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने 'भूकमुक्त जग' (हंगर-फ्री वर्ल्ड) हा कार्यक्रम राबविला जातो. कुशल बल्लवाचार्यांद्वारे स्वच्छ वातावरणात पौष्टिक अन्न तयार करण्यासाठी विविध ठिकाणी आधुनिक स्वयंपाकघरे या उपक्रमांतर्गत उभारण्यात आली आहेत. मलाबार समूह आणि थानलचे स्वयंसेवक पदपथांवरील बेघर आणि शहरी उपनगरातील गरजू लोकांना ओळखतात आणि अन्नाची पाकिटे त्यांच्या दारापर्यंत पोहोचवतात.

एनजीओचे हे स्वयंसेवक उपासमारीच्या सामाजिक आणि आर्थिक कारणांचे मूल्यांकन करण्यासाठी लाभार्थ्यांचे सर्वेक्षण देखील करत आहेत. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, मलाबार समूहाने थानलच्या सहकार्याने, गरीब आणि निराधार वृद्ध महिलांची ओळख पटवून घेऊन, त्यांना मोफत भोजन, निवास आणि इतर आरोग्य सेवा पुरवण्यासाठी 'ग्रँडमा होम' प्रकल्प या आधीच सुरू केला आहे. बेंगळुरु आणि हैदराबादमध्ये अशी दोन 'ग्रँडमा होम' उभारण्यात आली आहेत. चेन्नई, कोलकाता, दिल्ली, मुंबई आणि केरळमधील काही निवडक शहरांमध्ये अशीच घरे येत्या काळात उभारण्याची योजना सुरू आहे. यामुळे उपेक्षित आणि निराधार महिलांना सन्मानाने जगण्याची संधी मिळणार आहे. मलाबार समूहाने रस्त्यावरील वंचित समाजघटकांतील मुलांच्या प्राथमिक शिक्षणाला पाठिंबा देण्यासाठी सूक्ष्म-शिक्षण कार्यक्रम देखील सुरू केला आहे.

याशिवाय, मलाबार समूह इतर सामाजिक कल्याण आणि सेवाभावी उपक्रमांमध्ये सक्रिय आहे जसे की वैद्यकीय सेवेसाठी आर्थिक सहाय्य, वंचित समाजघटकांतील गरजू मुली/ विद्यार्थीनींना शैक्षणिक समर्थन आणि घर बांधणीसाठी आंशिक समर्थन यांचा त्यात समावेश आहे. समूहाने मलाबार गोल्ड अँड डायमंड्ससह त्याच्या अन्य व्यावसायिक अंगांमधून मिळणाऱ्या नफ्यांपैकी पाच टक्के रक्कम सामाजिक कल्याण कार्यांसाठी अर्थात सीएसआर निधी म्हणून राखून ठेवला आहे. अशा समाजकल्याण कार्यक्रमांसाठी समूहाने आतापर्यंत २४६ कोटी रुपये खर्च देखील केले आहेत.

# थोडक्यात



## सोयाबीन पिकाचे उत्पन्न वाढीसाठी मार्गदर्शन शिबिर संपन्न

**सोलापूर (आरंभ पर्व) :** गौडगाव ता. बार्शी येथे खरीप हंगाम पूर्व प्रशिक्षण व प्रात्यक्षिक मोहीम अंतर्गत कृषी विभागाच्या वतीने सोयाबीन पिकाचे उत्पन्न वाढीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले यांनी खरीप पिकाविषयी व कृषी विभागाच्या सर्व योजनेची माहिती शेतकऱ्यांना दिली. यावेळी सरपंच स्वाती पैकेकर, उपसरपंच उमा शिंदे, विनायक गरड, राहुल भड, प्रभारी कृषी मंडळ अधिकारी संजय करळे, कृषी पर्यवेक्षक दयानंद चापले, कृषी सहाय्यक रघुनंदन कादे, बाळासाहेब ढेकळे, संभाजी पाटील, अण्णासाहेब नलवडे, कृष्णानाथ शेळके, अनिता शिंदे, गणेश चव्हाण तसे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री शरदचंद्रजी पवार प्रशाला सारोळे 100%निकालाची परंपरा कायम

**सोलापूर (आरंभ पर्व) :** शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळ शेळगाव आर संचलित शरदचंद्रजी पवार प्रशाला सारोळे चा सन 2024 चा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. प्रशालेने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. येथे प्रथम राजकन्या एकनाथ निचळ 90.88% द्वितीय संजीवनी मसा शेरखाने 90.7% तृतीय सोनाली भैरवनाथ गाटे 90% यानी यश संपादन केले.त्यांना मुख्याध्यापक ए.डी शिंदे शिक्षक दीपक अंधारे विश्वनाथ साबळे सर गोरे सर खोत सर आर पी गायकवाड गोडगे मॅडम व इतर यांचं सहकार्य लाभले.त्यांचे संस्थेचे संस्थापक सचिव लक्ष्मणराव गायकवाड अध्यक्ष बाबा गायकवाड संचालक विलासदादा गाटे गावचे सरपंच बाळराजे गाटे माजी उपसरपंच जितेंद्र चौधरी व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

## 'स्वतंत्रते भगवते'तून उलगडल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कविता

**पुणे (आरंभ पर्व) :** 'जयोऽस्तु ते! जयोऽस्तु ते! श्री महन्मंगले.. शिवास्पदे..शुभदे ... ', 'जय देव जय देव जय शिवराय..' ही छत्रपती शिवाजी महारांवरील आरती ते 'सागरा प्राण तळमळला..' या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांच्या विररसाने भारलेल्या कवितांच्या सादरीकरणाच्या माध्यमातून स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी करण्यात आली.

# दूध उत्पादकांना कोणी वाली आहे का?

## शेतकऱ्यांचा सवाल : दूध उत्पादकांकडे दुर्लक्ष



**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**
श्री. लक्ष्मण साबळे

लोकसभा निवडणुकांच्या धामधुमीत शेतकऱ्यांकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले.महत्वाचा घटक दूध उत्पादकाकडे ऐन दुष्काळात दूध उत्पादनासाठी संघर्ष करावा लागतोय.अतिशय तीव्र स्वरूपाची पाणी व चारा टंचाई असतानाहीं त्यातून मार्ग काढत दूध उत्पादन सुरू आहे.

मात्र तरीही 27/28 रुपये दर मिळत असल्याने शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांनी सरकारचे धोरणं हे शेतकऱ्यांविरोधात असल्याचे सांगत सारोळे ता.बार्शी येथील शेतकऱ्यांनी निषेध व्यक्त केला.


लाख लाख रुपयांच्या गाई म्हशी विकत घेतं त्यांच्यासाठी लागणारा खुराक व चारा यांच्या वाढल्या किमती वाढल्या आहेत.मात्र दर जुनाचं आहे. यामुळे दूध उत्पादकाना अच्छे दिन कसे येतील असा प्रश्न विचारला जातोय. मागील दोन महिन्यात शासनाने प्रतिलिटर पाच रुपये अनुदान जाहीर केले. होते ते आणखी शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत.

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर शासनाने पाच रुपये अनुदान जाहीर केले होते परंतु निवडणुका संपताच अनुदान बंद केले.

लोकसभा संपली आता विधानसभेत आम्ही रंग दाखवू त्यापूर्वी सरकारने दुधाचा दर वाढवावा.शेतकऱ्यांचा मालाला योग्य बाजारभाव मिळावा यासाठी ठोस अशी मागणी केली आहे.



शेतकऱ्याच्या हितासाठी काम करायला हवं?नाहीतर शेतकऱ्याला हातात दाव घ्यावं लागेल. सरकारने दूध दर वाढवायला हवं तरंच दूध उत्पादकांना लाभ होऊ शकतो. **- संतोष कुलकर्णी, दूध उत्पादक**



पाणी चारा टंचाई असतानाही दुधाचे दर हे 27 ते 28 रुपये आहेत. बेरोजगारीला पर्याय म्हणुन अनेक युवक दुग्ध व्यवसायाकडे वळले आहेत. दूध उत्पादक शेतकऱ्यांना हा दर अंत्यत नाममात्र आहे यावर निर्णय झाल्यास शेतकऱ्यांना फायदा होऊ शकतो शिवाय दूध संकलनहीं वाढू शकते.

**- अमर पाटील, मा.उपसरपंच/चेअरमन, नरसिंह दूध वितरक प्रकल्प सारोळे**



# पुष्पा सुरेश कोतवाल यांची सरपंचपदी बिनविरोध निवड

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

अष्टापूर गावच्या सरपंचपदी पुष्पा सुरेश कोतवाल यांची बिनविरोध निवड करण्यात आली. अश्विनी नवनाथ कोतवाल यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिल्यामुळे निवडणूक घेण्यात आली. पुष्पा सुरेश कोतवाल यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड निवडणूक निर्णय अधिकारी नूरजहाँ सय्यद यांनी जाहीर केली. याप्रसंगी हवेली ता. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती -संचालक प्रकाश जगताप, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुभाष जगताप, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक शामराव कोतवाल, माजी सरपंच अश्विनी कोतवाल, उपसरपंच गणेश कोतवाल, माजी उपसरपंच - ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ कोतवाल, कालिदास कोतवाल, सुभाष कोतवाल, संजय कोतवाल, अलका कोतवाल, कविता कोतवाल, रेश्मा ढवळे, ग्रामसेवक मिलिंद महाले, ग्रामपंचायत सदस्य, आजी माजी सरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावच्या सर्वांगीण विकासाकरता सर्वांना विश्वासात घेऊन कामकाज करणार असल्याचे नवनिर्वाचित सरपंच पुष्पा कोतवाल यांनी सांगितले.

# परांजपे स्कीम्स 1000 सदनिकांचा ताबा देण्यास सज्ज

## एकंदर कार्पेट एरिया 4,50,000 चौ फूट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील गृहबांधणी व्यवसायातील आघाडीचे नाव असलेल्या परांजपे स्कीम्स ने त्यांच्या ब्लू रिज टाउनशिप, फॉरेस्ट ट्रेल्स टाउनशिप तसेच वाकड येथील ब्रॉडवे या गृहप्रकल्पांमधील 1000 हून अधिक सदनिकांचा ताबा देण्याची सज्जता केली आहे. तीनही प्रकल्पातील या सदनिकांचे एकंदर क्षेत्रफळ 4,50,000 असेल. परांजपे स्कीम्स या ब्रँड ची ग्राहकांबद्दलची बांधिलकी आणि उत्तम गुणवत्तेची घरे बांधण्याची क्षमता यांना अधोरेखित करणारा हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

या सदनिकांची भर पडून परांजपे स्कीम्स चा पुण्यातील व्यवसाय विस्तारणार आहे. ग्रूव्हज या ब्लू रिज मधील संकुलात या आधी 4500 घरांचा ताबा देण्यात आला आहे. फॉरेस्ट ट्रेल मध्ये या आधी ताबा देण्यात आलेल्या घरांमध्ये अथश्री मधील नव्या घरांची भर पडणार आहे. परांजपे स्कीम्स च्या वाकड येथील ब्रॉडवे या प्रीमियम प्रकल्पाला या आधीच्या टप्प्यातही ग्राहकांचा मोठा प्रतिसाद लाभला होता.

परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेड चे व्यवस्थापकीय संचालक श्री शशांक परांजपे म्हणाले, " या 1000 हून अधिक सदनिकांचा ताबा देण्याची घोषणा करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. उत्तम गुणवत्तेची घरे बांधून पूर्ण करण्याच्या आमच्या ट्रॅक रेकॉर्ड हमीचा प्रत्यय यातून येत आहे. आमचे ग्राहक आम्हाला अत्यंत प्रिय आहेत आणि त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यास आम्ही बांधील आहोत. ग्राहकाने ज्या प्रकारचे घर घेतले असेल त्या प्रकारातील सर्वोत्तम घर मिळाल्याचा आनंद त्याला देण्यावर आम्ही आमचे सर्व लक्ष केन्द्रित करतो. आमच्या वाकड, हिंजवडी आणि भूगांव येथील या प्रकल्पांत वास्तव्य हा एक अजोड अनुभव ठरावा हा उद्देश या प्रकल्पांचे नियोजन करताना असतो. या नव्या प्रकल्पांतील ग्राहकांचे आम्ही त्यांच्या घरांत स्वागत करतो."

या नुकत्याच पूर्ण झालेल्या प्रकल्पांत परांजपे स्कीम्स ची अजोड प्रकल्प परिपूर्ती क्षमता, कसलीही तडजोड न करता उच्च गुणवत्ता निकषांचे पालन आणि गृहनिर्माण क्षेत्रातील विश्वसनीयता हे सारे प्रतिबिंबित झाले आहे.

## परांजपे स्कीम्स विषयी

35 वर्षांहून दीर्घ परंपरा असलेल्या परांजपे स्कीम्स ने आजवर 210 उत्तम प्रकल्प पूर्ण केले आहेत. देशातील 9 शहरात परांजपे स्कीम्स चे निवासी आणि व्यापारी प्रकल्प उभारले गेले आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी निवासी प्रकल्प विकसित करण्याची सुरुवात परांजपे स्कीम्स ने केली तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी खास सोयी असलेली घरेही निर्माण केली. पुणे शहरात परांजपे स्कीम्स चे स्थान ठळकपणे जाणवते तसेच मुंबई ठाणे, बंगळुरू आणि वडोदरा येथेही कंपनीचे प्रकल्प आहेत.

# एल अँड टी फायनान्स लि ची सुरक्षित वित्तपुरवठा पर्यायांसाठी फोनपेबरोबर भागीदारी

- घर आणि दुचाकी खरेदीच्या वित्तसहाय्यासाठी कंपनीतर्फे सुरक्षित कर्जपुरवठ्याचे पर्याय
- फोनपेच्या देशभरातील सुमारे ५३५ दशलक्ष ग्राहकांना विविध पर्याय सादर करण्याचे लक्ष्य

L&T Finance

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशातील अग्रगण्य नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी (एनबीएफसी) एक असलेल्या एल अँड टी फायनान्स लिमिटेडने (एलटीएफ) वित्तीय सेवा आणि उत्पादनांची विस्तृत श्रेणी प्रदान करणाऱ्या फोनपे या भारतातील आघाडीच्या फिनटेक कंपनीसोबत धोरणात्मक भागीदारी केली आहे. या भागीदारींतर्गत आर्थिक उत्पादनांची श्रेणी आणखी विस्तृत केली जाणार आहे, त्याचबरोबर घर तसेच दुचाकीच्या खरेदीसाठी ग्राहकांना सुरक्षित कर्जपुरवठा करणे, हे दोन्ही कंपन्यांचे या धोरणात्मक भागीदारीमागील उद्दिष्ट आहे. घर आणि वाहनांच्या खरेदीसाठी वित्तपुरवठ्याचा पर्याय शोधत असणाऱ्या ग्राहकांना हाऊसिंग आणि टू-व्हीलरसाठी असलेले वित्त पर्याय आणखी सक्षम केले जाणार आहेत. एल अँड टी फायनान्सच्या 'कमप्लीट होम लोन' योजनेसह कर्जदार त्यांच्या घराच्या अंतर्गत सजावटीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी 'होम डेकोर फायनान्स'चा लाभ घेऊ शकतील. तसेच कंपनीच्या 'डिजिटाइज्ड प्रक्रियेचा' अनुभवही घेऊ शकतील. याचबरोबर त्यांना या प्रक्रियेत येणाऱ्या समस्या ते 'डेडीकेटेड रिलेशनशिप मॅनेजर' च्या सहकार्याने सोडवू शकतील. कर्जदार आता एलटीएफच्या विविध वित्तीय पर्यायांची चाचपणी करत त्यांना हवा असलेल्या पर्याय निवडू शकतील. यामुळे ग्राहकांना त्यांची आर्थिक धोरणे आणखी अनुकूल करणे शक्य होणार आहे.

शिवाय, गृह आणि दुचाकी खरेदीसाठी एलटीएफ देत असलेल्या वित्तपुरवठा पर्यायांमुळे कर्जदार 8.65 टक्क्यांपासून सुरू होणारे स्पर्धात्मक व्याजदर तसेच 30 वर्षांपर्यंतच्या परतफेडीच्या कालावधीसाठी सुलभ वित्तपुरवठा सहज मिळवू शकतील. फोनपेबरोबरील भागीदारीबाबत टिप्पणी करताना एलटीएफच्या अर्बन फायनान्स विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गरयाली म्हणाले, फोनपेसोबतची आमची भागीदारी देशभरातील ग्राहकांना नाविन्यपूर्ण आर्थिक सेवा प्रदान करण्याच्या आमच्या वचनबद्धतेतील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. फोनपेचा आर्थिक विश्वातील सखोल विस्तार आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर त्याचबरोबर विश्वासार्ह वित्तीय पर्याय प्रदान करण्यात एल अँड टी फायनान्सचे असलेले कौशल्य यांचा वापर करून कर्ज पुरवठ्याच्या क्षेत्रामध्ये क्रांती घडवून आणणे, हे या धोरणात्मक सहकार्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे अतिशय मोठ्या प्रमाणावर आर्थिक समावेशकतेला गती दिली जात आहे.

या भागीदारीमुळे आम्हाला ठाम विश्वास आहे की, कर्ज वितरणाच्या क्षेत्रात एलटीएफ आणि फोनपे नवीन मापदंड प्रस्थापित करत असून सुविधा, प्रवेशयोग्यता आणि ग्राहकांच्या समाधानाला नवीन परिभाषा देण्यासाठी सज्ज झालेले आहेत."

फोनपे लेंडिंगचे सीईओ हेमंत गाला म्हणाले, ही भागीदारी आम्हाला फोनपेचे तांत्रिक कौशल्य आणि एल अँड टी फायनान्सची कर्ज वितरणात असलेल्या विश्वासार्ह अनुभवाच्या फायद्यासह 535 दशलक्षपेक्षा अधिक ग्राहकांची विस्तृत संख्या या सर्वांना एकत्र जोडण्याची संधी देते. त्यातून आमच्या वापरकर्त्या ग्राहकांना त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी एकाच मंचावर सुरक्षित असे कर्जाचे पर्याय निवडण्याची संधी मिळत आहे. आम्हाला विश्वास आहे की, कर्ज वितरण अर्थप्रणालीशी जोडल्या गेलेल्या ग्राहकांसाठी सुरक्षित कर्ज योजनारूपी अनुभवामध्ये क्रांती घडवून आणण्याची ही उत्तम वेळ आहे."

एलटीएफने आतापर्यंतचे उच्चांकी तिमाही कर्ज वितरण केलेले असून ते 2,513 कोटी रुपयांवर पोहचले आहे. घरखरेदी आणि मालमत्ता व्यवसायाआधारे कर्ज या प्रकारात वित्तीय वर्ष 2024 च्या चौथ्या तिमाहीत (Q4FY24) कंपनीने वार्षिक 70 टक्के वाढ साध्य केली आहे.

विविध प्रदेशात आपले अस्तित्व वाढविणे, सक्षम असे डीएसए तसेच विविध वितरण प्रणालींसोबत भागीदारी आणि ग्राहक टिकवून ठेवण्यासाठी राबविलेल्या धोरणात्मक उपायांद्वारे व्यवसायात निरंतर गती राखत कंपनीने या विभागातील वाढीला आणखी वेग दिलेला आहे.

एलटीएफने २०२४ च्या चौथ्या तिमाहीत दुचाकी कर्ज व्यवसायात २,५०२ कोटी रुपयांचे कर्ज वितरीत केलेले आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीत १,७२७ कोटी रुपयांच्या वितरण्याच्या तुलनेत त्यात यंदा ४५ टक्के वाढ झालेली आहे. विविध बाजारपेठांत अधिकाधिक खोलवर प्रवेश, ग्राहकांसाठी मूल्यनिर्मितीवर आपले लक्ष केंद्रीत ठेवणे आणि बाजारपेठेतील हिस्सा वाढवण्यासाठी पसंतीचे डीलर / ओईएमबरोबर सहकार्याचे संबंध आणखी दृढ करत या विभागात आपल्या व्यवसाय वाढीला कंपनीने आणखी पाठबळ दिलेले आहे. वाहन उद्योगातील आघाडीच्या कंपन्यांसोबत सखोल आणि नवनवीन सहकार्यातून प्राइम आणि ईव्ही सेगमेंटमध्ये अधिकाधिक व्यवसाय वाढीवर एलटीएफ नेहमी आपले लक्ष केंद्रित करते.

# अपोलो हॉस्पिटल्सने मिळवले हृदय प्रत्यारोपणात 100% यश!

- सन 2017 पासून 10 हृदय प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण
- "अवयव दान ही जीव वाचवणारी संधी आहे. निस्वार्थी भावनेने माणुसकी जोपासणारी अद्भुत कृती आहे" – अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथील सीव्हीटीएसचे वरिष्ठ सल्लागार आणि हृदय व फुफ्फुस प्रत्यारोपणाचे शल्यविशारद, डॉ. संजीव जाधव




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्सने 2017 पासून 10 हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडून यशाचा 100% निकाल लावत प्रत्यारोपण प्रक्रियेत एक महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. एका विशेष कार्यक्रमात हृदय प्रत्यारोपण केलेल्या रुग्णांपैकी 5 रुग्णांचा सत्कार करण्यात आला. नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्स येथील हृदय व फुफ्फुस प्रत्यारोपणाचे शल्यविशारद आणि सीव्हीटीएस चे वरिष्ठ सल्लागार डॉ. संजीव जाधव यांनी हृदय प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया पार पाडली.

पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्स येथील सीव्हीटीएस चे वरिष्ठ सल्लागार, हृदय व फुफ्फुस प्रत्यारोपणाचे शल्यविशारद डॉ. संजीव जाधव यांनी अपोलो हॉस्पिटल्स, नवी मुंबई येथील हृदय प्रत्यारोपण प्रक्रियेच्या यशामध्ये मोलाचा वाटा उचलला आहे.

या प्रसंगी डॉ. जाधव म्हणाले, "हृदय प्रत्यारोपणामुळे हृदयविकाराच्या शेवटच्या टप्प्यातील व्यक्तींना पुन्हा एकदा नवी संधी मिळते. आम्ही केलेली हृदय प्रत्यारोपण प्रक्रिया म्हणजे नवीन बाय-कॅव्हल (bi-caval) तंत्र होते, ज्यामध्ये रोगग्रस्त किंवा निकामी झालेले हृदय काढून टाकले जाते आणि त्याच्या जागी निरोगी दात्याने दिलेले हृदय बसवले जाते. बाय-कॅव्हल (bi-caval) तंत्र ऍट्रिया किंवा हृदयाच्या वरच्या चेंबरची सामान्य शरीर रचना कायम राखते आणि शस्त्रक्रियेदरम्यान व शस्त्रक्रियेनंतर गुंतागुंत होण्याचा धोका कमी करण्यास मदत करते. नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्स येथील सर्वसमावेशक हृदयविज्ञान प्रक्रिया हृदयविकाराच्या शेवटच्या टप्प्यात असलेल्या व्यक्तींसाठी जीवनरक्षक उपाय प्रदान करते. आजपर्यंत 100% यशाच्या दरासह 10 हृदय प्रत्यारोपण प्रक्रिया पूर्ण करून अद्वितीय यश मिळवल्याचा आम्हाला अभिमान वाटत आहे."

डॉ. जाधव यांनी हृदय प्रत्यारोपणाच्या माध्यमातून जीवनात बदल घडलेल्या रुग्णांची ओळख करून दिली. मुंबईतील मुलुंड येथे राहणाऱ्या एका 29 वर्षीय पुरुष रुग्णामध्ये डायलेटेड कार्डिओमायोपॅथी (डीसीएमपी) आणि 15% एवढे लेफ्ट वेंट्रिक्युलर इजेक्शन फ्रॅक्शन (एलव्हीईएफ) चे निदान झाले होते, त्यामुळे 15 जुलै 2021 रोजी त्यांच्यावर ऑर्थोटॉपिक बाय-कॅव्हल हृदय प्रत्यारोपणाची प्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर, रवी यांच्यामध्ये उल्लेखनीय सुधारणा दिसून आली, ज्यामध्ये एलव्हीईएफ 60% पर्यंत वाढले. 3 ऑगस्ट 2021 रोजी त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आणि आज ते परिपूर्ण आयुष्य जगत आहेत.

आणखी एक रुग्ण म्हणजे नाशिकमधील 40 वर्षीय पुरुष रुग्णाला इस्केमिक कार्डिओमायोपॅथी आणि 10% एवढे इजेक्शन फ्रॅक्शन (ईएफ) होते, या प्रक्रियेद्वारे त्यांनाही जगण्याची नवी आशा मिळाली आहे. 20 ऑक्टोबर 2022 रोजी त्यांच्यावर ऑर्थोटॉपिक बाय-कॅव्हल (bi-caval) हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली, मग शस्त्रक्रियेनंतरच्या इकोकार्डियोग्राममध्ये 50% ईएफ दिसून आले. 16 नोव्हेंबर 2022 रोजी त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आणि आता ते पुन्हा सामान्य जीवन जगत आहेत.

आणखी एक आव्हानात्मक प्रकरण म्हणजे रायगडमधील 30 वर्षीय पुरुष रुग्णाला रिस्ट्रिक्टिव्ह इन्फिल्ट्रेटिव्ह कार्डिओमायोपॅथी आणि हृदयाच्या एमायलॉइडोसिसने ग्रासले होते. 4 मे 2023 रोजी त्यांच्यावर यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले, ज्यामुळे त्यांच्यात लक्षणीय सुधारणा दिसून आली आणि त्यांना 22 मे 2023 रोजी उत्कृष्ट बाय-वेंट्रिक्युलर कार्य होत असल्यामुळे त्यांना डिस्चार्ज देण्यात आला.

बुलढाण्यातील 31 वर्षीय पुरुष रुग्णाचा आजार अंतिम टप्प्यात होता आणि 10% ईएफ होते, तसेच यापूर्वी डिसेंबर 2022 मध्ये हृदयविकाराच्या झटक्यातून ते बचावले होते. 6 डिसेंबर 2023 रोजी त्यांच्यावर हृदय प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आणि याचा परिणाम म्हणजे शस्त्रक्रियेनंतर ईएफ 50% एवढे झाले आणि म्हणून त्यांना 22 डिसेंबर 2023 रोजी डिस्चार्ज देण्यात आला.

सर्वात अलीकडे मिळाले यश म्हणजे सोलापूरमधील 30 वर्षीय पुरुष रुग्णाला इस्केमिक हृदयरोग झाला होता आणि 20% ईएफ होते. 15 मार्च 2024 रोजी त्यांच्यावर प्रत्यारोपणाची प्रक्रिया पार पडली, पुढे प्रत्यारोपणानंतर चांगला इकोकार्डिओग्राम परिणाम आला आणि ते लवकर बरे होऊ लागले म्हणून 4 एप्रिल 2024 रोजी त्यांना डिस्चार्ज देण्यात आला. यावेळी डॉ. संजीव जाधव यांनी अवयव प्रत्यारोपणाच्या व्यापक सामाजिक लाभांवर देखील भाष्य केले.

ते म्हणाले, "अवयव दान म्हणजे जीव वाचवणारी प्रक्रिया आहे आणि याद्वारे हृदयविकाराच्या रुग्णांना आयुष्य जगण्याची एक नवी संधी दिली जाते. हीच खरी मानवता आहे. या रुग्णांमध्ये यशस्वी हृदय प्रत्यारोपण झाले आणि त्यांना नवीन जीवन मिळाले, म्हणून आम्हाला आशा आहे की याद्वारे अवयवदानाच्या अतिशय महत्वाच्या गरजेबद्दल जागरूकता वाढेल आणि अधिक लोकांना अवयव दान करण्याची प्रेरणा मिळेल." अपोलो हॉस्पिटल्सचे पश्चिमी क्षेत्राचे प्रादेशिक सीईओ श्री संतोष मराठे म्हणाले, "हृदय प्रत्यारोपणात 100% यशाचा टप्पा गाठणे हा अभिमानाचा क्षण आहे, खरंतर हा आमच्या डॉक्टरांच्या आणि नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्समधील हृदय प्रत्यारोपण टीमच्या कौशल्याचा पुरावा आहे.

ओपोलो येथील महत्वाच्या अवयव प्रत्यारोपण प्रक्रियेत हृदय, फुफ्फुस, मूत्रपिंड आणि यकृत प्रत्यारोपणाचा समावेश आहे आणि ही प्रक्रिया प्रख्यात शल्यचिकित्सकांच्या नेतृत्वात पार पाडली जाते. विशेष म्हणजे या टीममध्ये नेफ्रोलॉजिस्ट (मेघविद्यातज्ञ), हेपॅटोलॉजिस्ट, यूरोलॉजिस्ट (मूत्ररोगतज्ञ), इंटेन्सिव्हिस्ट (अतिदक्षता तज्ञ), रेडिओलॉजिस्ट (क्ष-किरणशास्त्रज्ञ), प्रत्यारोपण समन्वयक, सामाजिक कार्यकर्ते, मानसोपचार तज्ञांसह विविध क्षेत्रातील तज्ञांचा समावेश असतो. 2017 सुरुवातीपासून, नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्सने 348 मूत्रपिंड प्रत्यारोपण, 204 यकृत प्रत्यारोपण आणि 10 हृदय प्रत्यारोपण पार पाडले आहेत.

आम्ही झेडटीसीसी (झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर) आणि वाहतूक नियामक अधिकाऱ्यांचे आभारी आहोत, कारण त्यांनी वेळेवर अवयव पोहोचण्यासाठी प्रशासनात्मक आणि ग्रीन कॉरिडॉर मार्गासाठी सहकार्य केले. अवयव प्रत्यारोपण करण्यास पाठिंबा दिल्याबद्दल आम्ही दात्यांच्या कुटुंबांचे आभारी आहोत आणि कृतज्ञ आहोत. आम्हाला विश्वास आहे की या यशस्वी प्रत्यारोपणामुळे अधिकाधिक लोकांना अवयव दान करण्याची प्रेरणा मिळेल आणि भविष्यात आणखी जीव वाचविण्याची आम्हाला संधी मिळेल."

## सावरकर जयंतीनिमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशनच्यावतीने रक्तदान शिबिर संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
स्वातंत्र्यवीर सावरकर फाऊंडेशनच्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांच्या जयंती निमित्त आयोजित 'स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती महोत्सव 2024' चे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत आज रक्तदान शिबिर भरवण्यात आले. यामध्ये 51 जणांनी रक्तदान केल्याची माहिती स्वातंत्र्यवीर सावरकर फाऊंडेशनचे सचिव मेघश्याम देशपांडे यांनी दिली. यावेळी सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर, भाजपचे शहराध्यक्ष धिरज घाटे भाजप व्यापारी आघाडीचे पश्चिम महाराष्ट्र



अध्यक्ष महेंद्र व्यास, भाजप महिला शहराध्यक्ष हर्षदा फरांदे, महिला सरचिटणीस प्रियंका शेडगे – शिंदे, सरचिटणीस व्यापारी आघाडी नयन ठाकूर, भाजप कसबा विधानसभा ओबीसी अध्यक्ष देवेंद्र वडके, ग्राहक पेठेचे सूर्यकांत पाठक, माजी नगरसेवक महेश वाबळे, अमित कंक सरचिटणीस कसबा मतदारसंघ, राजू दादा परदेशी सरचिटणीस कसबा मतदारसंघ आदी यावेळी उपस्थित होते.

उपक्रमांबद्दल बोलताना स्वातंत्र्यवीर सावरकर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रितम थोरवे म्हणाले, स्वातंत्र्यवीर सावरकर फाऊंडेशनच्या वतीने यंदा प्रथमच 'स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती महोत्सव 2024' चे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत आम्ही तीन दिवस विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे, त्याचाच एक म्हणून आजचे रक्तदान शिबीर भरवण्यात आले होते, आमच्या सर्व उपक्रमांना आणि गणेश हॉल, न्यू इंग्लिश स्कूल येथे होत असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे थोरवे यांनी नमूद केले.

## भारतीय व्यवसायिक ग्राहकांना अजोड वाहतूक सेवा प्रदाता मुव्हीन या यूपीएसच्या ब्रॅन्डचा दुसरा वर्धापनदिन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
मुव्हीन, या यूपीएस आणि इंटरग्लोब एन्टरप्रायझेस यांच्या संयुक्त भागीदारीतून निर्माण झालेल्या मुव्हीन या वाहतूक सेवा प्रदात्या ब्रॅन्ड तर्फे भारतातील व्यावसायिकांना वाहतूक सेवा देत असतांनाच दुसरा वर्धापन दिन साजरा केला. गेल्या दोन वर्षांत कंपनी ने त्यांचे अस्तित्व निर्माण केले असून कंपनी कडे सध्या 1500+ ग्राहक, 3500 +पिन कोड्स, 49 शहरे यामध्ये सेवा देण्यात येत असून अजोड वाहतूक सेवे मध्ये एअर एक्सप्रेस आणि ग्राऊंड सेवांचा समावेश आहे. मुव्हीन च्या सक्षम पायाभूत सुविधां मुळे ही वाढ शक्य झाली आहे. त्याच्या चेन्नई, हैद्राबाद, अहमदाबाद, कोलकाता, पुणे, मुंबई, बंगलोर





आणि दिल्ली एनसीआर मधील एअर ॲन्ड ग्राऊंड हब्ज मुळे वस्तूंची वाहतूक ही सातत्यपूर्ण, अंदाज करण्यायोग्य आणि प्रतिसादात्मक कार्य करणे शक्य झाले आहेत. कंपनीच्या मालकीची एकूण 2 लाख चौरस फूटांची केंद्रे असून यामुळे मालाची वाहतूक आणि वितरण सहज करणे शक्य झाले आहे. यामध्ये यूपीएस आणि मुव्हीनच्या पुणे आणि कोलकाता येथील एकत्रित केंद्राचा ही समावेश आहे. कंपनी च्या संपूर्ण भारतात जवळजवळ 500 कर्मचारी हे कार्यालये आणि हब्ज मध्ये कार्यरत आहेत.

शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी मुव्हिन ने 20 हून अधिक इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही) चा विकास केला असून यामुळे प्रथमच अगदी शेवटच्या टोकापर्यंत डिलिव्हरी करता येते. ही वाहने दिल्ली, मुंबई, पुणे, कोलकाता, हैद्राबाद आणि चेन्नईत असून यामुळे वर्षाला 17 टन कार्बनचे उत्सर्जन कमी होत आहे. हा उपक्रम म्हणजे कंपनीच्या दीर्घकालीन शाश्वत अशा सेवा ग्राहकांना देऊन त्यांचे ईएसजी लक्ष्य पूर्ण करण्यासाठी टाकलेले एक पाऊल आहे.

"गेल्या दोन वर्षांत मुव्हीनने केलेल्या कामगिरीचा आंम्हाला अभिमान आहे." असे मुव्हीन एक्सप्रेस चे संचालक जे बी सिंग यांनी सांगितले " आमच्या ग्राहकांनी दिलेल्या सातत्यपूर्ण सहकार्य आणि भागीदारी बद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. पुढे जातांना आमचे हे लक्ष्य आहे की हा ब्रॅन्ड भारतातील आघाडीचा एक्सप्रेस लॉजिस्टिक्स ब्रॅन्ड बनावा. आम्ही नेहमीच आमच्या लोकांच्या क्षमता वाढवून त्यांना सक्षम करत आमच्या भागीदारांबरोबर जोडून तंत्रज्ञानातील कुशलता आणण्या मध्ये सातत्याने गुंतवणूक करत राहू. विभागातील सर्वोत्कृष्ट लॉजिस्टिक्स सेवा देऊन आम्ही सर्व आकाराच्या व्यवसायांना शक्तीशाली करून त्यांना नवीन उंचीवर नेऊन राष्ट्राच्या वाढीत योगदान देऊ शकू."

## ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस





● लेखक ●
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजि विद्यापिठ प्रतिनिधी नागपूर)

**(दै. आरंभ पर्व)**
संपूर्ण जगातील लोकांना तंबाखू पासून मुक्ती मिळावी व आरोग्य सुदृढ रहावे या उद्देशाने तंबाखू व धुम्रपान यापासून होणारा त्रास दुर करण्याकरीता तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो.जागतिक आरोग्य संघटना डब्लुएचओच्या सदस्य देशांनी तंबाखू सेवनाने होणाऱ्या बिमारीचा मृत्यू दरात वाढ झाल्यामुळे 1987 ला महामारी घोषीत करण्यात आली व तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याचा सल्ला (सुझाव) देण्यात आला.8 एप्रिल 1988 ला डब्लुएचओने वर्षगाठ साजरी केली व याच दिवशी 31 मे तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून 31 मे जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो.डब्लुएचओने तंबाखू सेवनाने होणाऱ्या 25 प्रकारच्या शारीरिक बिमाऱ्या पहाता व 40 प्रकारचे कैंसर पहाता आणि या बिमारीचा वाढता मृत्यू दर पहाता याला महामारी घोषीत केली.डब्लुएचओच्या माहिती नुसार जगात तंबाखूने किंवा धुम्रपान केल्याने दरवर्षी 80 लाखांपेक्षा जास्त लोकांना आपले प्राण गमवावे लागतात. यावर जगातील देशांनी नियंत्रण ठेवले नाही तर मृत्यूचा आकडा दुप्पटीने वाढु शकतो.

कोणत्याही नशेली पदार्थाचे अती सेवन करणे म्हणजे मृत्यूला कवटाळले होय.मानवाची जगण्याची दशा,दीशा ठरवीने हे मानवाच्या मनावर व हातामध्ये असते. परंतु आपल्या मनावरचा ताबा सोडून नशेली पदार्थाचे सेवन केले तर स्वत:ला व परीवाराला घातक सीध्द होवु शकते याला नाकारता येत नाही. तंबाखूच्या सेवनाने कॅन्सर सारखे महाभयानक आजाराने मानुस जखडतो आणि यांचा दुषपरीणाम संपूर्ण परीवाराला भोगावा लागतो.ह्याबाबी मानवाने स्वत: समजुन घ्यायला हव्यात.कोणत्याही नशेच्या बाबतीत सरकारचे दुटप्पी धोरण आपल्याला पहायला मिळते. सरकार नशेली वस्तुची खुलेआम विक्री करण्यास प्राधान्य देते व मोठ्या प्रमाणात परवाने सुध्दा देते आणि दुसरीकडे नशा न करण्याचे आव्हान करते याला कोणते धोरण म्हणावे? मध्यंतरी महाराष्ट्रत दारू-वाईन किराणा दुकान विक्रीला ठेवता येईल या चर्चेला मोठे उधाण आले होते.या चर्चेचा सर्वच स्तरातून निषेध करण्यात आला. त्यामुळे ताबडतोबच या चर्चेवर पुर्णविराम लागला. सरकारने नशाबंदीचे मोठ-मोठे सरकारी ऑफिसेस खोललेली आहेत. याकरीता देशभरात लाखो कर्मचारी कार्यरत असतात. याव्यतीरीक्त अनेक रजिस्टर्ड सामाजिक संस्था व्यसनमुक्तीसाठी कार्य करतांना दीसतात.परंतु सरकार स्वत:हुन नशेली पदार्थाचे उत्पादन बंद करायला तयार नाही. कारण नशेली(मद्द,तंबाखू,खैनी, सिगारेट,बिडी, गुटखा,गांजा इत्यादी) वस्तुपासुन राज्य व केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल (रेव्हेन्यू) मिळत असतो व त्यावर सरकारचा कारभार चालतो. यावरून स्पष्ट होते की सरकार पैसा कमविण्याकरीता दुटप्पी धोरण अवलंबुन मानवाचा जीव धोक्यात टाकत आहे. कोव्हीड-19च्या महामारीच्या काळात संपूर्ण भारतासह अनेक राज्यांमध्ये लॉकडाउन होता याकाळात दारूची दुकाने खोलण्याची मागणी सर्व प्रथम राजकीय पुढाऱ्यांची होती आणि अनेक राज्यांमध्ये लॉकडाउनच्या काळात दारूची दुकाने खोलण्यात आली. यामुळे सरकारच्या तिजोरीत करोडो रुपयांचा महसूल रुपात पैसा जमा झाला.यावरुन स्पष्ट होते की पैशासाठी सरकार लोकांना व्यसनाधीन करीत आहे. लॉकडाउनच्या काळात दारू, सिगारेट, बीडी,तंबाखू, खैनी, गुटखा,खर्रा,गांजा याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा होता ह्या वस्तु अवैधरीत्या दुप्पटीने किंवा तिपटीने लोकांनी घेतल्या परंतु नशासोडण्याला कोणीही महत्त्व दिले नाही. लॉकडाउनच्या काळात लोकांना नशा सोडण्याची सुवर्णसंधी होती.परंतु नशेली वस्तुंची दुकाने खुलताक्षणी सोशल डिस्टिंक्शनची धज्जीया उडवून नशेली वस्तु घेण्याकरिता 3 कीलो मिटर पर्यंत लोक रांगेत उभे होते.अशाने कोणत्याही नशेवर आळा बसणार नाही. प्रत्येकानी जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणीही नशेच्या आहारी जावु शकत नाही. कोणतीही नशा असो ती घातकच असते. परंतु अती नशा मृत्यूच्या खाईत नेल्या शिवाय रहाणार नाही.याला म्हणतात"अती तिथे माती". त्यामुळे कोणतीही नशा करतांना सावधगिरी बाळगली पाहिजे.अन्यथा जिवीत हानी अटळ आहे. तंबाखू, गुटखा,खैनी,खर्रा, सुपारी, दारू यापासून शरीराच्या कोणत्याही अवयवांच्या विकासासाठी चालना देत नाही मग या वस्तूचे सेवन का करावे? कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला "छल्ली" व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. उदाहरण द्यायचे झाले तर बादाम 1000 रुपये किलो यांच्या तुलनेत गुटखा 4400 रुपये किलो, शुद्ध तुप 600 रुपये किलो यांच्या तुलनेत तंबाखू 1700 रुपये किलो, सफरचंद100 रुपये किलो यांच्या तुलनेत सुपारी 600 रुपये किलो,दुध 50 रुपये लिटर यांच्या तुलनेत दारू 600 रुपये लिटर अशा प्रकारे अशा अनेक पोष्टीक वस्तू आहेत की त्यांची किंमत नषेली वस्तू पेक्षा कितीतरी पटीने स्वस्त व कमी आहेत.परंतु नशा करणारे बहाद्दर नशेला जास्त महत्त्व देतात हे त्यांचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.कोव्हीड-19च्या महामारी पासून सरकारने रस्त्यावर थुंकण्यावर बंदी घातली होती त्याचप्रमाणे सरकारने तंबाखू,गुटखा,खैनी, खर्रा,गांजा यावर सुध्दा बंदी घालायला पाहिजे होती.यामुळे मृत्यू दर कमी होण्यास मोठी मदत होईल. करोना काळात कोरोना महामारीचा प्रकोप दीवसेंदीवस वाढत असतानाच केंद्रशासित प्रदेशासह 28 राज्यांनी तंबाखू व धुम्रपानामुळे कोरोणाची लागन होण्याची शक्यता पहाता. त्यातच फुफ्फुसाचा कर्करोग होतो किंवा रोगप्रतिकारक शक्ती कमी होते असे आरोग्य तज्ञांचे म्हटले होते.या पार्श्वभूमीवर तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा सेवन आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घालने उचीत होते तीच पद्धत नेहमीसाठी सरकार कडून अमलात यायला हवी. सध्याच्या परीस्थितीत युवापिढी "धुम्रपानाच्या"आहारी जातांना दिसत आहे.त्यांनी मनावर ताबा ठेवुन धुम्रपानाचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन धुम्रपानाचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे "मृत्यूच्या रांगेत"उभे रहाल्यासारखे आहे.याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे.सरकारने कीतीही नशेली वस्तु विकण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्शसुध्द करु शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत कोणीही रस्त्यावर तंबाखू,खर्रा किंवा इतर नशेली वस्तू थुंकु नये याची काळजी घ्यायला हवी.कारण रस्त्यावर थुंकल्याने अनेक बिमाऱ्यां व संक्रमनात मोठ्या प्रमाणात वाढ होवून आरोग्य धोक्यात येऊ शकते. त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे. आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील" त्याचप्रमाणे "आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.

त्यामुळे तंबाखू खर्रा खावुन रस्त्यावर थुंकु नका व कोणत्याही महामारीला जाहीर आमंत्रण देवु नका ही माझी आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे.याकरीता तंबाखू निषेध दिनाच्या निमित्ताने आपण"संकल्प"करूया की यानंतर धुम्रपान व इतर नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करू या.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.